# गोड गोड भावगीतं



म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. २४६०

REFBK-0019888
REFBK-0019888

# निवडक संगीत संग्रह

हींच

**खरी गृहशोभा**

* लालित्यपूर्ण शास्त्रीय संगीत
* शास्त्रशुद्ध ललित संगीत
* बोलपट संगीत
* भावगीतें
* संघगीतें
* पोवाडे, लावण्या इत्यादि राष्ट्रीय पारंपरिक संगीत
* विनोदी प्रहसनें

वगैरे संगीतकलेंतील विविध प्रकार
सुप्रसिद्ध 'हिज मास्टर्स व्हाईस'
रेकॉर्डसमधून निवडा
व
गृहशोभा वाढवा

**धी ग्रामोफोन कंपनी लि०**

कलकत्ता – मुंबई – मद्रास – दिल्ली

"HIS MASTER'S VOICE"


मुखपृष्ठ छपाई : हिंद प्रिंटिंग वर्क्स् : मुंबई ४

# गोड गोड भावगीतें

● आवडत्या भावगीतांच्या स्वररचनेसह ●

[ भाग तिसरा ]

संपादक : गजानन काशीनाथ रायकर

मूल्य आठ आणे

स्वररचना : सदानंद श्रीधर गोसावी

REFBK-0019888
REFBK-0019888



जयहिंद प्रकाशन

## कृतज्ञता !

'गोड गोड भावगीतें' या पुस्तकाचे दोन भाग सर्वांनाच आवडले. 'तिसरा भाग अगदीं लौकर लौकर काढा' अशीं असंख्य पत्रें आलीं; म्हणूनच हा तिसरा भाग प्रकाशित होत आहे.

पहिल्या भागांतील, रसिकांना आवडलेल्या गीतांची स्वर-रचनाही यांत दिली आहे. **श्री. के. नारखेडे**, श्री. **श्रीनिवास खारकर**, श्री. **दत्ता वाळवेकर**, **श्री. अंभईकर**, श्री. **नामदेव व्हटकर**, श्री. **वि. बा. पावले**, श्री. **जूंकर**, **श्री. गोसावी** व कलावंत श्री. **मुळगांवकर** यांनीं बहुमोल सहाय्य केलें. त्यांचे उपकार फिटणार नाहींत.

—ग. का. रायकर

---


### कोण म्हणतो काव्याचीं अन् गाण्यांचीं पुस्तकें खपत नाहींत ?

**बृहन्महाराष्ट्रांतील खेड्याखेड्यांत व घरघरांत सांजसकाळ गायिल्या जाणाऱ्या गाण्यांचा संग्रह**

## गोड गोड भावगीतें : भाग ४ था

रेकॉर्ड झालेलीं गाणीं वारंवार ऐकून कंटाळा येणें अगदीं साहाजिक आहे ! म्हणूनच या चौथ्या भागांत एकहि रेकार्ड झालेलें गाणें नाहीं. कृपया रागावूं नका ! शांतपणें गाणें वाचा अन् जरासें गुणगुणून त्याची **चाल** लावा. म्हणजे तुम्हीच चांगले गवई व्हाल. अनेक भावगीत गायकांनीं हीं गाणीं आपल्या खाजगी कार्यक्रमांत गाऊन लोकांना वेड लावलेलें आहे. या सर्व गाण्यांची सचित्र नवीन सजावट आहे.

**सुंदर तिरंगी मुखपृष्ठ : मूल्य आठ आणे**



मुद्रक : रघुनाथ रामचंद्र बखले : मुंबई वैभव प्रेस : गिरगांव : मुंबई ४

प्रकाशक : गजानन काशीनाथ रायकर : झावबाची वाडी : मुंबई २

२१८० माध्य



# हवाच मृग तो मला!

१२८८८

: कवि :
**ग. दि. माडगूळकर**



हवाच मृग तो मला, राघवा,
हवाच मृग तो मला !

कुंदलतांच्या कुंजामधुनी
विजेपरी तो येई अंगणीं
जणूं सोन्याचा शेला आला

प्रिया, प्रियतमा, हे रघुराया
त्या हरिणाची साधा मृगया
थकवुन मज तो बघा धांवला !

मृगचर्माची मृदुल कंचुकी
लेवुन तुमची सखी जानकी
लाजवील या वनराणीला !

★

: गायिका :
**सीता मूल्की**

[ कोलंबिया ध्वनिमुद्रिका क्रमांक GE 3965 ]

# आलं माझ्या रायाचं

: कवि :
द. वि. गुप्ते

आलं माझ्या रायाचं
सखे माझ्या धन्याचं
गल्बत ग
नाचत डुलत ग !

हिरवं हिरवं कापित पाणी
रायाची ये दरिया राणी
झुकत झुकत ग !

खळ्खळ् करीत
लाटांशीं खल्बत
डौलांत डुलत ग !

: स्वररचना :
जी. एन्. जोशी

धवल पांढरं बगळ्यावाणी
फडफड हाले शिड वाऱ्यानीं
रायाच्या नावेचं ग !

बोलक्या नेत्रांत
वळ्खील गुपित
येईल धांवत ग !

: कलावंत :
सौ. स्नेहलता मराठे

[ ' हिज मास्टर्स व्हॉइस ' रेकार्ड नं. N15110 ]

# अम्हाला काम सुचेना गडे !

ग्रंथ संग्रहालय
९२८१

: कवि : के. नारखेडे

[ ‘ कोलंबिया ’ ध्वनिमुद्रिका क्रमांक GE 3314 ]

: गायक : कुरवाळीकर

बघा न अमुच्याकडे—अम्हाला
काम सुचेना गडे !

लागतें न जों निंदायाला,
काम काढुनी त्या बाजूला
येतां, न दिसे तण डोळ्याला
बघतां तुमच्याकडे—अम्हाला

दूध गायिचें काढित असतां
घालाया तिज चारा येतां
धार दुधाची तुम्हांस बघतां
पडते भलतीकडे—आम्हाला

लागतांच मी धुणीं धुवाया
तुम्हां सांपडे कसें यावया ?
एकाएकी भिजते काया,
पाणी कोठुनि पडें !—अम्हाला

भाजी चिरतां विळी घेउनी,
...ी बसते पुढे येउनी,
...ो तों भान हरपुनी
... सांपडे—अम्हाला

लावित असतां दिवा, येउनी
विझवी फुंकर कोण घालुनी ?
काळोखामधिं कवळी धरुनी,
हृदय किती धडधडे-अम्हाला

पळ् हें वेचितों कधी मैत्रिणी,
काम व्हावया म्हणतों गाणीं,
तोंच येतसे स्वारी दिसुनी
शब्द आमुचा अडे-अम्हाला

दिसतां, कधि मी लक्ष न देई,
काम सारखें करीत राही
कोण लक्ष वळवाया पाही,
फेकुनिया हो खडे—अम्हाला

सदा भोंवतीं कां घुटमळतां ?
काम आपुलें टाकुनि फिरतां,
गोंधळांत का मना पाडतां ?
भलतें हें सांकडें-अम्हाला
काम सुचेना गडे !

## अंगणांत खेळे राजा

: कवयित्री :
आशा गवाणकर

अंगणांत खेळे राजा रंगरंगुनी
चांदण्यांत अंग सारे माखमाखुनी
बघतसे जग बाई रोखरोखुनी
जगाचे त्या डोळे झाका जागजागुनी
नको खेळूं राजा माझ्या अंगणांत रे
दृष्ट लागे भय वाटे ये घरांत रे
तुझा होई खेळ, मला नाहीं थार रे
ये घरांत राजा माझ्या ये घरांत रे
बांधीं पैंजणास पायीं नाच चांदणी
बाळ खेळुं दे जगास घेई वेधुनी
हास हास रातराणी गोड हासुनी
बाळ खेळुं दे जगास टाकी भारुनी

: गायिका:
मालती पांडे

## श्रावण आला

: कवि :
माडगूळकर

श्रावण आला ! नाहीं आला माझा प्राणसखा
तळमळे जीव सारखा
बाहेर डोलती नटनटुनी पालवी
ये लता—लतांवरी नवनवी टवटवी
अंगाचा मम दाह वाढवो, पळापळानें फुका
बाहेर ओतती जलधारांच्या सरी
ळसळा वाहती जललहरी भूवरी
श्रुंनीं मम भिजले तरीही सुकले
हे गाल असे कां

: गायिका :
मालती पांडे

[ 'कोलंबिया' ध्वनिमुद्रिका क्रमांक GE 8295 ]

## विझले दिवे !

: कवि :
माडगूळकर

: स्वररचना :
अंभईकर

: गायक :
वि. दे. अंभईकर

विझले नगरामधले दिवे
तुझ्या स्मृतिचा दीप साजणा
अजुनी नच मालवे

शय्येवरती माझ्या रसिका
फुलें अंथरू अथवा कलिका
मंदिर मोडुनी लावुं काय तरी
कुसुम लतांचे थवे

तुझें नि माझें होतां मीलन
जाइ सुगंधें काया भारुन
दिधली सुमनें तुला दिसावी
इतुकें मजला हवे

★

## पत्र देउनी पाठविलें

: कवि :
माडगूळकर

: स्वररचना :
अंभईकर

: गायक :
अंभईकर

पत्र देउनी पाठविलें मी एक कबूतरा तुला
शिकार समजुन तूंच तयाला
बाण कसा मारिला
पत्र मिळालें तुटलें अंतर
तुझें नि माझें जुळलें अंतर
हाय परि तें कुठे कबूतर
तुझ्या प्रीतिचा योग जयानें येथवरी घडविला

( संगीत सुधाकर )

★

# पहिलीच भेट

: कवि :
स. अ. शुक्ल

पहिलीच भेट ही आज आपुली
सख्या साजणा !
नीट वाग रे जपुन

अधर चुम्बिशी जवळ ओढुनी
कवळुन मला उराशीं
झटशी कां अंगाशीं
लगट करून पदराशीं
करूं नकोस ना भलते चाळे
देहभान हरपून
राया, नीट वाग रे जपून !

तुझीच झालें जन्माची मी
आतां कशाला अधीरता ?
चन्देरी रात्रीं रंगेल आपुली
राजा-राणीची प्रेमकथा !
पाळत ठेवुन अवचित पाहिल
कुणि तरी लपून छपून

ऊर धडधडे, सोड ना गडे,
कुणितरी असेल टपून

: गायिका :
साधना पैगंणक


# सांग पोरी सांग

: कवि :

विहंग

सांग पोरी सांग
सांग कुणी जादु अशी केली गडे सांग
लाजु नको सांग ग !

ओठ तुझे हासती पाहुनि सांग कुणाला
गालीं तुझ्या रंगविली सांग गडे ग–
कुणी तिन्हीसांज



पाउलाची चाहुल लागे
पाहसि कां आगे मागे
सांग कां ग पाठलाग
कुणी करी मागे मागे

सांग कुणी हांसविले गोड तुझे निळे डोळे
बोलतांना दृष्टि अशी सांग गडे ग—
कुणा न्यहाळे !

: गायक :

दत्ता वाळवेकर

रीगल ध्वनिमुद्रिका क्रमांक RL 2585

## शाम मनोहर माझा

: कवि :
ग. के. दातार

शाम मनोहर माझा,
शोभत गोकुळीं राजा
कुंजविहारी तो मनहारी
वाजवी मंजुळ बासरी
भवती जमल्या गोकुळ नारी
चढविती सुंदर साज

: गायक :
राम मराठे

★

## प्रेमळ भाव तुझा

: कवि :
ग. के. दातार

प्रेमळ भाव तुझ्या मनींचा
सखये मी ओळखला
नव्या नवतिच्या प्रणयलीला
पाहुनी जीव पहा फुलला
आला आला भेटायाला

: गायक :
राम मराठे

[ कोलंबिया ध्वनिमुद्रिका क्रमांक GE 3909 ]

# राया भारीच उशीर झाला !

स्थळ प्रत

: कवि :

द. वि. गुप्ते

राया भारीच उशीर झाला
आतां पोंचायचं कधीं घराला

: स्वररचना :



जी. एन्. जोशी

किती किर्र्रर गर्द ही झाडी
काट्याकुट्यांत फाटल् साडी
कशी भीति न तुझ्या जिवाला

नागमोडी ही पाउल्वाट
सख्या नेईल दरींत थेट
जरा झुकतां तोल् कडेला

खांद्यावरी विसांवुन माथा
आलें चढून डोंगर माथा
आतां पोंचव धरून करांला

: कलावंत :

सौ. कालिंदी केसकर

कोलंबिया ध्वनिमुद्रिका GE 3279

# हें काय गडे ?

: कवि :
विहंग

हें काय गडे ?
कां उगाच मजला छळितां
नयन रोखुनी कां बघतां ?

मज कळला तुमच्या डोळ्यामधला भाव
कां उगा दावितां नव्हेच तुमचा गांव
कां उगाच चोरुन हसतां ?

मी पुसते त्याचा येइल तुम्हा राग
तुम्ही कुणा विचारून लावियली फुलबाग
कां मौन गडे हें आतां ?

मज ठाउक आहे चोराची चतुराई
मज न कळत माझें हृदय चोरिलें बाई
कां उगाच गालीं हसतां ?

: गायक :
दत्ता वाळवेकर

★

# आशा

: कवयित्री :

सौ. संजीवनी मराठे



होईल का रे सांग पुरी
ही आशा माझ्या मनांतली ?

रात्र असो वा दिवस असूं दे
तुफान दर्या वर उसळूं दे
खोपटांत गणगोत असूं दे
चल हांकारूं नाव जळीं
ही आशा माझ्या मनांतली

जळवंतीच्या निळया महालीं
उजवुन घेऊं प्रीत आपुली
फेनाची वेंचुन मुक्तावलि
सजवूं अंगांगें अपुलीं
ही आशा माझ्या मनांतली

अष्टदिशांना गाउन गाणीं
गुंफूं अपुली प्रेमकहाणी
तूं मम राजा मी तव राणी
दिगंतरा राज्यें अपुलीं
ही आशा माझ्या मनांतली

चल चल हाकारीं निज नाव
दूर माझिया मनचा गांव
अढळ ध्रुवापरि ठेवुनि भाव
ओलांडूं जीवन नकली
ही आशा माझ्या मनांतली

★

# चंद्रा !

: कवि :

श्रीनिवास खारकर

चंद्रा ! दाखव मजला वाट
एकलीच मी जाते ध्याया आज
सख्याची गाठ !

माय-तात ते प्रेमळ सगळे
पण प्रीतीचें पहिलें वहिलें
त्यांस मनोगत नाहीं कळलें
त्यापायीं मी दूर लोटलें भरल्या
घरचें ताट !

पाय टाकितां मी पहिल्यानीं
आडविलें मज उंबरठ्यानीं
त्यास तिथें पण सांगितलें मी
प्यार मला रे प्रीतीचा त्या
झोपडींतला थाट !

होइल आतां उशीर मजशीं
ठरल्या जागीं वेशीपाशीं
असेल गाडी तयार खाशी
जाऊं कशी पण? अंधारानें भरला
नदीचा कांठ !


भंवतालीचें जग हें अवघें
आज मजकडे बघतें रागें
जाऊं नको तूं मेघामागें
ह्या बहिणीचा भाऊ होउन, ये
रे पाठोपाठ !



: गायक :

विश्वास काळे

★



# गाडीवान् दादा

: कवि :
श्रीनिवास खारकर

गाडीवान् दादा, ने गाडी भराभरा
आज मला जायाचं माझ्या माहेरा !

सोडायचं घर ह्यांचं आज पहिल्यांनीं
टच्कनी डोळीयांना आलं रे पाणी
डोळे पुसाय्ला, आला माहेरूचा, ओळखिचा वारा ! १

आई ! तुझी लेक नेली परक्यांनी
गंगेला मिळालें यमुनेचें पाणी
फिरुन् मिळूं दे, मला आईच्या, मायेचा निवारा ! २

नदीच्या कांठाला बाबांचें घर
तिथें आठवणींची भरली घागर
चल भाऊराया, पुन्हां पावसांत, वेचायला गारा ! ३

गेलें बाळपण पुन्हा आठवीन
माहेराची माया मनीं साठवीन
स्वारीचा हुकूम, येतांच पुन्हा मी, जाइन् माघारा ! ४
गाडीवान् दादा, ने गाडी भराभरा !!

: गायिका :
सरोज वेलिंगकर

★

# नगरच्या किल्ल्याचें मनोगत

: कवि :
श्रीनिवास खारकर

बेइमान झालो पुरा पुरा
मी देशाचा अपराधि खरा !
भारत मातेचे हे प्यारे
स्वातंत्र्याचे उज्वल तारे
बंदिवान मी केले सारे
मज क्षमा करा हो क्षमा करा !
मी परक्यांचा सेवक बनलो
आईला अन् भार जाहलो
मीठ खावुनी हराम झालो
ही खंत जाळिते आज उरा !
हृदय जरी हें पाषाणाचें
नाहीं पण तें निर्दय साचें
भयाण एकान्तीं रात्रीचें
ते ढाळी असवांच्या धारा !
हे देवांनो ! गगनामधुनी
लाख चांदण्यांच्या डोळ्यांनी
नका नका हो बघुं रागानीं
तो शाप जरा अवरून धरा !
पुरता आतां निश्चय केला
दाखवीन मी सर्व जगाला
तुरुंग आतां भारतांतला
ठरणार क्रांतिचा देव्हारा !
एक प्रतिज्ञा आज अन्तरीं
ढासळेल हा देह भूवरी
देइन हें बलिदान अखेरी
पण मुक्त करिन ह्या वीरा ! !

★

: गायक :
वाटवे



# उशीवरील नांव

माझिया रे उशीवरी नांव तुझें विणलेलें
आसवांच्या मोतीयांनीं आज मी हें गुंफिलें

गेलास एकली आज मला टाकुनी
नखरेल कोणशी तिजवरती मोहुनी
परि विसरलास तूं याद तइची सारी
आलास जेधवा केवळ एक भिकारी
हृदयाची तुज भिक्षा घालुन नांव तुझें घेतलें
आसवांच्या मोतीयांनीं आज मी तें गुंफिलें

हें दिधलें होतें निर्मळ जीवन तुजला
परि सुंदर तलाव मृगजळांत तुज दिसला
परि व्याकळुनी जाई परतुन येशिल दारीं
निर्झर झुळझुळ पाहशील तूं, या माझ्या अंतरीं
हेंच नांव मग तुझ्या अश्रुनीं पाहिन मी भिजलेलें
आसवांच्या मोतीयांनीं आज मी जें गुंफिलें

: कवि :
नामदेव व्हटकर

★

# चल नाच नाच रे नंदकिशोरा

: कवि :
ग. के. दावार

चल नाच नाच रे नंदकिशोरा
सूर मुरलीचा घुमव जरा

*  *  *

रुमझुम रुमझुम पैंजण वाजती
तालावरती गोपी नाचती
सुर स्वर्गांतुनि कौतुक पाहती
आनंदाचा दिवस खरा

*  *  *



जललहरींचा नाच थांबला
अवखळ वायू मध्यें थबकला
कोकिळ गाई न गायनाला
कांय जादू ही मुरलीधरा

: गायिका :
लता मंगेशकर

★

# रुसलास कां सख्या रे ?

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. नं. 92481

: कवि :

स. म. शुक्ल



रुसलास कां सख्या रे,
कां धरिलास अबोला ?

तुझ्या संगती डुलतां झुलतां
आशेवरती डुलतां फुलतां

तोल जिवाचा सुटला
अवचित तुटला झोला !

तूंच आधि फुलबाग फुलविला
तूंच परंतु पायीं तुडविला

तोडिशी हें काळीज कां ?
घाव जिव्हारीं ओला !

तुझ्याच पायीं जगास मेल्यें
तूंहि मला कां दूर लोटिलें ?

बोल सख्या मधु बोला
कां धरिलास अबोला

: गायिका :

कुमुदिनी पेडणेकर

★

# लाला कोणासाठीं

: कवि :
मनमोहन

विश्वाशीं मी वैर वरिलें,
काऱ्हा कोणासाठीं ?
दुनियेशीं मी दावा धरिला,
लाला कोणासाठीं ?
जहरी लहरी कालिया
भुलविल तुजला भूलभुलैय्या
नको साहसें करूंस सैय्या,
चिंध्यांच्या चेंडूसाठीं

भावाशीं भांडलें
ताईशीं तणतणलें
वडिलांना वंचिलें
पाऱ्हा पाजणाऱ्या आईशीं,
मी झालें उफराटी

माझें बाई माहेर भरलें
चांदीच्या घराला
सोन्याचीं कौलें
राजकुमारी धावलें मी,
गवळ्याच्या पोरापाठीं

नको बिंदी मोतियाची
नको सरी सोनियाची
नको चमकी माणकाची
दसलाखी तव हातांचा रे,
हार माझ्या कंठीं



: गायक :
विश्वास काळे

★

# चार दिवस नाहीं गेले माहेरीं

: कवि :

मनमोहन नातू

चार दिवस नाहीं ग गेले माहेरीं
मी नवी नवरी
तों यांचीं शंभर पत्रें आलीं !

* * *

काय ग हा बाइल वेडेपणा
पोस्टाचा शिपाई हंसे पत्रें देतांना
हसे वहिण भाऊ आई
त्रैनी डोळे मिचकावी
मैत्रिणी म्हणती पतिची
बुद्धी मी मारिली

* * *

रोज गजरे आणती
येतांना ऑफिसांतुनी
चाळीचा जिना चढतांना
लावणीच्या घेती ताना
उष्टे आवरल्याविण
वास गुलाबाचा घेऊं बघतं।



: गायिका :

सुनीला चरेगांवकर

★

# घेतें मी नांव, थांबा गडे !

घेतें मी नांव, थांबा गडे ॥ ध्रु० ॥

आधिच गेलें मी भांबावुन
नका बाई ग सोडु पिसाळुन ।
सगळ्याजणि अशि करूं नका ग--
उगाच ही काव काव ॥ १ ॥

त्यांचीच मूर्ती डोळयांपुढती
लाजेनें पण डोळे मिटती
छळता का मज टाकुन पुढतीं—
भलता सलता डाव ॥ २ ॥



हवा कशाला तुम्हां उखाणा
नजरे पुढती त्यांना आणा
ठाऊक आहे नांव तुम्हाला--
का मग मजला भाव ॥ ३ ॥

या ओठांवर नांव घुटमळे
कसं उच्चारूं? जीभ अडखळे
नांव घ्या तुम्ही म्हणजे मग मी—
म्हणेन पुढचें राव ॥ ४ ॥

: कवि :
भालचंद्र खांडेकर

★

# झुंजुमुंजु झालं

: कवि :
बाबुराव गोखले



झुंजुमुंजु झालं चकाकलं समदं रान
पगुन् शात सोन्यावानी हरपूतया भान

घरट्यांत चिंव चिंव करीती पांखरं
गव्हानीत चुळूबूळू करीती वासरं

आळुखपिळुखं आतां कशाचं ग रानीं
उपसाया होवं आधीं मोटंचं पानी

सुनं खळं बैल विना चाऱ्याविना बैलं
जशी म्हातीं रायाविना घरांत बाईल

शिळंपाकं कांहींतरी आन रातचं ग
न्याहारीला बिगीबिगी बसूं संगसंगं

नग झांकुं पदरांत कनसाचं दानं
नग दावुं लई भाव घेईन हातानं

पिरतीचं पीक लई येई माळावर
राबुनशान खाऊं संगं सकाळ दुपार

चढूं डोंगरांचीं माथीं तुडवूं ओहोळ
हातामंदी घालुन हात फिरूं रानोमाळ

: गायक :
बाटवे

★

# आली दिवाळी मंगलदायी

: कवि :
दत्ता डावजेकर

आली दिवाळी मंगलदायी, आनंद झाला घरोघरीं
चला चला ग जमुनि मैत्रिणी, गुंफूया विविध फुलें मधुनी,
हार तोरण गजरे माळा, लौकरी चला चला फुलें आणा,
आनंद झाला घरोघरीं ॥ १ ॥

* * * *

रेखोनि रांगोळी अंगणिं या, फुलें चौफुले रंगी भरूया,
मांगल्याची सजव मूर्ती गोजिरी, चला चला त्वरा करा,
आनंद झाला घरोघरीं ॥ २ ॥

* * * *

अंजिरी दीप डुले गगनीं, चंदेरी शालु तुला रमणी,
सुंदर नटली लक्ष्मी ही कितीतरी, पहा पहा चला तरी,
आनंद झाला घरोघरीं ॥ ३ ॥

* * * *

हातीं सोनियाची आरती, लखलखती माणिक ज्योती,
ओवाळुनि, घे प्राण तुझा पदरीं, आणा आणा निरंजना,
आनंद झाला घरोघरीं ॥ ४ ॥

: गायिका :
लता मंगेशकर

★

# आज दिवाळीला आला माझा भाऊराया !

सं. नं. 72-47
स्थळ प्रत

: कवयित्री :

सौ. संजीवनी मराठे

आज दिवाळीला आला माझा भाऊराया !
बहिणीच्या भेटीसाठीं आला भाऊराया !

वाटेवरती किती ग ऽ शिणला असेल
प्रवासांत दिसभर भुकेला असेल
झणीं घालिते मी न्हाऊं तुला भाऊराया !

अंबेमोहोराचा भात तूप कणीदार
भाऊ तुझ्यासाठीं केली पहा पुरी खीर
नीटपणें जेवायाचें अतां भाऊराया !

लावियलें निरांजन वेळ आरतीची
तबकांत ओवाळणी पडे आवडीची
ओळखलें माझें मन तुला भाऊराया !

परतून इतुक्यांत जासी भाऊराया
ओढ लाविते का तुजसी वहिनीची माया
सुखी सर्वकाळ दोघें रहा भाऊराया !
आज दिवाळीला आला माझा भाऊराया !

: गायिका :

सुमन बाणावलीकर


★

# वेडीपिशी झाले !

: कवि :
गोविंदस्वामी

वेडिपिशी झाले. मी
राया तुझ्यावर मोहुन गेलें
वेडिपिशी झाले राया
ओवाळीन माझी काया
तूंच मला जिंकिलें.

देहलतेवर गुलाब फुलले
तुला अर्पिलीं फुलें
हृदय सागरीं तव प्रीतीची
उठताती वादळें
हृदय जाहलें खुळें
बाजिराव तूं मी मस्तानी
कृष्ण तूंच मी राधाराणी
मनोमनीं कचदेवा तव मी
देवयानि जाहले
जोंवरि फुलते नभि तारांगण
धरतीवरती फुलें
तोंवरि पूजिन हृदयमंदिरीं साक्ष
तुझी पाउलं
राणी, मैत्रिण, म्हण वा दासी
तुझीच मी जाहले
तुझी तुझी जाहले



: गायक :
गोविंदस्वामी आफळे

★

# कैशी म्हणूं " अहो जाहो ? "

सांग तरी रे तुजला कैशी म्हणूं ' अहो जाहो '
छे ग बाई ! जुळत नाहीं, बोलगेंच राहो!

रस्ता एकच दो बाजूला दोन घरें अपुली
सांजसकाळीं मी तुज आणखी तूंहि मला देखिली
भातुकली खेळलों दोघे मांडुन रस्त्यावर ठावो
सांग तरी रे तुजला कैशी म्हणूं 'अहो जाहो '



लपंडाव मांडला बालपणीं माझीया अंगणीं
त्यावेळींहि लपले होते तुझ्या घरीं येउनी
शोधुनी तुचांच धरिले हातास हांसुनिया हो हो
सांग तुला रे तुजला कैशी म्हणूं 'अहो जाहो '

अरेतुरे बोलतां उमलली बालपणाची कळी
अकस्मात ठाकलास पुढती बांधुनि मुंडावळी
बोलशी लगेच अतां म्हणावें मी तुज
' या हो जा हो '
छे ग बाई ! जुळत नाहीं बोलणेंच राहो !

: कवि :
नामदेव व्हटकर

★



# सासरीं निघालें ना ग मी!

: कवि :
मनमोहन नातू

डोळ्यांत साठवुनी घेतें तुला मी—आई
सासरीं निघालें ना ग मी
वरातीची गाडी दारीं। मोतियांच्या झालरी
शेल्याची गांठ, त्यांच्या उपरण्याला बांधिली
स्वारीची नजर चुकवून !
मुंडावळ्या डुलउन डुलउन
एकदांची मिठी माराया आलें मी

माझा गळा ग गहिंवरला
माझा डोळा डळमळला
बॅन्ड वाजूं लागला
क्षणाच्या फुरसतींत भेटूं कोणाकोणाला ?
भावांना ? बहिणींना ? बाबांना ?
नाहीं ग तें जमायाचें
मोजी तुझ्यामधें सारें मी
पडे पावसाचें पाणी, तसें माझ्या पापण्यांनीं
आई तुझा पदर टाकला ग भिजवोनी



: गायिका :
सुनिला चरेगांवकर

★

# माधव रे तुझ्या वेणूंत वसंत बहरे !

: कवि :

श्री. पांडुरंग एस्. दिक्षित

माधव रे तुझ्या वेणूंत वसंत बहरे ॥
स्वरास्वरांतुनि कोकीळ बोले
कुंजनवन डोले रे ॥

नाद लुब्ध व्रिज जन झुलती
नाचे गोकुळ सारे
हृदय अंबुजे फुलती खुलती
गुलाब गालीं हंसरे ॥

स्वरगंगा ही अशीच वाहुनी
गाइ गीत मधुमासा रे
खळखळ तरंग उठती जनमनी ·
नाचती लहरी मोदभरें ॥

चराचराच्या कणाकणांतुनि
घुमत घुमत तो नाद फिरे
विश्व शांतीचें, सवें तयाच्या
वाहती वासंतिक वारे ॥

: गायिका :

विनोदिनी दीक्षित

★

# पाहूं नको ग फिरून फिरून

: कवि :
मा. ग. पातकर

पाहुं नको ग फिरून फिरून
रूप गर्वि ते जाऊं नको ग
जखम जिव्हारीं करून
गरगर फिरवुन नयन पट्याचीं
फेक मारिसी तूं फेकून
हां हां म्हणता कितिक फांकडं
तडफडती ग हृदय कटून

कटी धाकटी जशी बोथाटी
लवलवते ग फिरून
डौल पाहतां तुझया चालिचा
चंद्रहि बसला दडुन

पदरा आडुन भर ज्वानीची
दिसते खूण उठून
मनांत कोणी शिरल म्हणून का
बसले पहारेकरी टपुन

फळ पाडाचें पाहुन येतिल
कळप राघुचे किती धावुन
अैक सांगणें पिकल्यावर ते
पाहिल का मग कोण चुकून



: गायक :
अनंत पाटकर

★



# झोपल्या राघूमैना

: कवि :
राजा बढे

झोपल्या राघूमैना,
गळ्यांत घालुनि मिठी
झांकुनी लाज लाजऱ्या नैना

दो दिवसांचं गोड चांदणं
जाइल जळुनी अभिमानें
उरतील अपणा, छळावयाला
लांब काजळी रैना



नकळत झुलता प्रीततरंगें
मनीं रेखिली मधु प्रतिबिंबें
नजरेतुनि निखळता, साजणी
जाइल फुटुनी ऐना

: गायिका :
मीनाक्षी

★

## थांब ना थांब ना

: कवि :
पी. सावळाराम

थांबना, थांबना
सख्या तूं जरासा
हळुच टाकूं दे
उरीचा उसासा ॥ ध्रु० ॥

भरल्या डोळ्यांनीं
पहावें फिरुनी
पुरव वेडीची
एवढी मनीषा ॥ १ ॥

झालें मी बेमान
चुकले कबूल
करी रे पावन
हंसुनी राजसा ॥ २ ॥

पाऊस डोळ्यांत
नको र जाताना
वाटेल पुन्हाही
मला तूं हवासा ॥ ३ ॥



: गायिका :
नलिनी मुळगांवकर

★



# स्वररचना

हे वयाच्या पंधराव्या वर्षांपासून हार्मोनियमची साथ करीत आलेले आहेत. हार्मोनियमच्या पाठोपाठ व्हायोलीन, बांसरी व मँडोलीन वगैरे वाद्यांचा पण यांनीं अभ्यास केला आहे.



हे शास्त्रोक्त संगीताची विशारद परिक्षा पास झाले आहेत. हे भावगीतेंही उत्तम गातात व शिकवितात. हे दादरला, हासन रंगारी चाळ नं. १ खोली नं. ५ मध्यें रहातात.

लेखक : **सदानंद श्रीधर गोसावी**

## स्वररचनेच्या चिन्हांची ओळख

**स्वर-चिन्हें**—( १ ) मंद्रसप्तक—स्वराखालीं टिंब : उदाहरणार्थ : **नि़ ध़ प़**

( २ ) तारसप्तक—स्वराच्या डोक्यावर उभी रेघ : उदाहरणार्थ : **सा॑ रे॑ ग॑**

( ३ ) मध्यसप्तक—खूण नाहीं : उदाहरणार्थ : **सा रे ग म**

( ४ ) कोमल स्वराचा—पाय मोडणें : उदाहरणार्थ : **ग् नि् ध्**

**ताल-चिन्हें**—( ५ ) तीव्र स्वर-काना देणें : **मा** ( ६ ) समेची टाळी : +

(७) कालाला : ० (८) अधिक मात्रा : ऽ (९) एका मात्रेंत दोन किंवा अधिक स्वर : ⌣

**मात्रांकरितां आंकड्यांचा उपयोग केला आहे.**

# हळू हळू बोल कृष्णा

* * [ ताल : केरवा ]

| + | ० | + | ० |
|---|---|---|---|
| १ २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ |
| प़सा सा सा रे | नि़पा सा नि़ ध़ | रेग म रेग सा | रे ऽ सानि़ रेसा |
| हळू ह ळू ऽ | बोऽ ल कृ ष्णा | हळू ऽ हळू ऽ | बोल ऽ ऽऽ ऽऽ |
| प़ ध़ नि़सा सारे | नि़ सा सा सा | सारे ग म ग | रे गरे सा ऽ |
| सा सू द ळि तेऽ | प ली क डे | तिला ला गे ल | का नोऽ सा ऽ |
| प़प़ ध़ नि़सा सारे | नि़सा सा सा सा | सारे ग म ग | रे ग रे सा |
| नणं द बस लीऽ | माऽ ज घ रीं | तिला ला गे ल | का नो ऽ सा |
| साध पप प पम | प ध धनि धऽ | पध पम गम गरे | रे ग रे सा |
| येऽ तिल के व्हांऽ | मा ऽ डिव रीऽ | नाऽ हींऽ याऽ चाऽ | भ र व सा |

परत पहिली ओळ वाजविणें

| + | ० | + | ० |
|---|---|---|---|
| साग रेग रेसा सारे | नि़ मासा सानि़ ध़नि़ | सा रे ऽ ऽ | सा सा रेम मम |
| अर्जू ऽन सूऽ रज | नाऽ हीं माऽ वळ | ला ऽ ऽ ऽ | तों च आऽ लास |
| पध पप ऽग रे | सा सा रेम म | पध नि ध ध | प म म प |
| चोऽ रपा ऽव ला | आ णि ढळ ता | पद र मा झा | ध र ला ऽ |
| मग पम गरे ऽ | प म गम गरे | रेग गरे सा ऽ | ऽ ऽ ऽ ऽ |
| ऽऽ ऽऽ ऽऽ ऽ | जी व माऽ झाऽ | घाऽ बर ला ऽ | ऽ ऽ ऽ ऽ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | | | ० | | | | + | | | | ० | | | |
| १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ |
| रेम | म | म | म | प | ध | म | प | म | ऽ | सा | ग् | रे | ऽ | ऽ | ऽ |
| अभा | ळा | त | चम | कू | दे | चं | द्रा | ला | ऽ | चं | द्रा | ला | ऽ | ऽ | ऽ |
| रेरे | म | म | प | धध | म | म | प | म | ऽ | सा | ग् | रे | ऽ | ऽ | ऽ |
| सग | ळ्या | चा | ला | गल्या | व | री | डो | ळा | ऽ | डो | ऽ | ळा | ऽ | ऽ | ऽ |
| सासा | रे | प | प | ग | म | ग् | रेरे | रेग | म | ग्रे | सा | सा | ऽ | रेग | म |
| रिझ | वा | ऽ | या | ये | इ | न | तुला | अल | बे | लाऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽऽ | ऽ |
| म | ऽ | म | ऽ | ग | म | प | ऽ | ग | म | ऽ | ग्रे | रेग | म | ग्रे | सा |
| कृ | ऽ | ष्णा | ऽ | व | च | न | ऽ | दे | ते | ऽ | तुला | अल | बे | लाऽ | ऽ |

*****

## नका गडे माझ्याकडे * * [ ताल : दादरा ]

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | | ० | | | + | | | ० | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा | ग | ऽ | म | प | ऽ | म | ग | ऽ | रे | सा | ऽ |
| न | का | ऽ | ग | डे | ऽ | मा | झ्या | ऽ | क | डे | ऽ |
| रे | रे | प | म | ग | म | रे | ग | रे | ऽ | ऽ | ऽ |
| पु | न्हा | ऽ | पु | न्हा | ऽ | पा | हूं | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| सा | ऽ | म | ग | म | ग | रे | ऽ | ग | नि़ | सा | ऽ |
| ला | ऽ | ज | रि | च्या | ऽ | रो | ऽ | प | टी | ला | ऽ |

| + | . |  | ० |  |  | + |  |  | ० |  |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| रे | ऽ | म | ग | रे | ग | सा | रे | सा | ऽ | ऽ | ऽ |
| **दृ** | **ऽ** | **ष्ट** | **न** | **का** | **ऽ** | **ला** | **वूं** | **ऽ** | **ऽ** | **ऽ** | **ऽ** |
| सा | नि | ऽ | सा | रे | ऽ | नि़ | सा | ऽ | रे | ग | म |
| **घो** | **टा** | **ऽ** | **ळ** | **ते** | **ऽ** | **पा** | **या** | **ऽ** | **मा** | **जी** | **ऽ** |
| ध | नि् | ध | प | ध | प | ग | म | म | ऽ | ऽ | ऽ |
| **तु** | **रु** | **ऽ** | **तु** | **रु** | **ऽ** | **चा** | **ऽ** | **ल** | **ऽ** | **ऽ** | **ऽ** |
| ध | नि् | ध | प | ऽ | प | प | ध | प | म | ग | रे |
| **आ** | **ऽ** | **ड** | **तां** | **ऽ** | **त** | **ओं** | **ऽ** | **ठा** | **ऽ** | **व** | **री** |
| ग | म | ग | रे | सा | रे | नि़ | सा | सा | ऽ | ऽ | ऽ |
| **म** | **ना** | **ऽ** | **त** | **ले** | **ऽ** | **बो** | **ऽ** | **ल** | **ऽ** | **ऽ** | **ऽ** |
| सा | नि़ | ऽ | सा | रे | ऽ | नि़ | सा | ऽ | नि़् | ध़ | ऽ |
| **न** | **का** | **ऽ** | **बा** | **ई** | **ऽ** | **मा** | **झ्या** | **ऽ** | **मा** | **गे** | **ऽ** |
| रे | रे | प | म | ग | म | रे | ग | रे | ऽ | ऽ | ऽ |
| **न** | **दी** | **ऽ** | **व** | **री** | **ऽ** | **ये** | **ऊं** | **ऽ** | **ऽ** | **ऽ** | **ऽ** |

पाहिली ओळ वाजविणें

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | ऽ | प | प | प | ऽ | मा | मा | ऽ | ग | ग | ऽ |
| **पा** | **ऽ** | **ही** | **ल** | **ना** | **ऽ** | **कु** | **णी** | **ऽ** | **त** | **री** | **ऽ** |
| रे | ग | ऽ | रे | सा | ऽ | रे | ऽ | मा | ग | ऽ | ऽ |
| **सो** | **डा** | **ऽ** | **मा** | **झी** | **ऽ** | **वा** | **ऽ** | **ट** | **ऽ** | **ऽ** | **ऽ** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | | • | | | + | | | • | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा | म | ग | म | रे | ऽ | मा | प | मा | प | ग | मा |
| मु | लु | खा | ऽ | चे | ऽ | द्वा | ऽ | ड | तु | म्ही | ऽ |
| प | ध | प | मा | ग | ऽ | मा | प | प | ऽ | ऽ | ऽ |
| नि | ला | ऽ | ज | रे | ऽ | धी | ऽ | ट | ऽ | ऽ | ऽ |
| सा | नि़ | सा | नि़ | सा | रे | नि़ | सा | ऽ | नि् | ध़ | ऽ |
| इ | तु | क्या | व | री | ऽ | हां | सु | ऽ | नि | यां | ऽ |
| रे | रे | प | म | ग | म | रे | ग | रे | ऽ | ऽ | ऽ |
| वे | ऽ | ड | न | का | ऽ | ला | वूं | ऽ | ऽ | ऽ | ऽ |

पहिली ओळ वाजविणें

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | ऽ | ग | म | ऽ | ध | ध | ऽ | सां | ध | प | ऽ |
| मा | ऽ | थ्या | व | री | ऽ | वै | ऽ | शा | खा | चे | ऽ |
| प | ध | प | मा | प | मा | प | सो | ध | ऽ | ऽ | ऽ |
| र | ण | र | णे | ऊ | ऽ | न | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| प | ऽ | ध | नि | सो | नि | ध | ऽ | नि् | ध | प | ऽ |
| छं | ऽ | दि | फं | ऽ | दी | डो | ऽ | ळी | यां | चे | ऽ |
| ध | ऽ | म | प | ऽ | ग | म | रे | ग | ऽ | ऽ | ऽ |
| त्या | ऽ | त | आ | ऽ | ग | वा | ऽ | ण | ऽ | ऽ | ऽ |
| सा | ऽ | ग | रे | सा | ऽ | | ध | नि | ऽ | ध | ऽ |
| वा | ऽ | व | र | ल्या | ऽ | ह | री | णीं | ऽ | चीं | ऽ |
| प | ध | ऽ | प | ऽ | ग | रे | ग | रे | ऽ | ऽ | ऽ |
| न | का | ऽ | पा | ऽ | ठ | घे | ऊं | ऽ | ऽ | ऽ | ऽ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | | | ० | | | | + | | | | ० | | | |
| १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ |
| रे | ग | रेसा | सासा | गप | पमा | पध | धप | ग | ग | ऽ | सा | रे | गसा | ऽ | ग |
| हो | ई | मोऽ | कळी | याऽ | कोऽ | ड्याऽ | चाऽ | झा | ला | ऽ | ऽ | उल | गडा | ऽ | क |
| रे | ग | रे | सा | रे | ग | ऽ | ग | रे | ग | रे | सा | रे | सा | ध़ | सा |
| सा | ग | ग | डे | झा | ला | ऽ | कु | णी | ग | वा | ई | के | ला | रा | धे |
| रे | मा | पध | माप | रे | ग | रे | सा | सा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| तु | झा | ऽऽ | ऽऽ | सै | ल | अं | बा | डा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |

## गळ्याची शपथ तुला जिवलगा * [ ताल : केरवा ]

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सा | रे | प | प | ध | म | प | ऽ | म | ग | म | रे | ग |
| | | | ग | ळ्या | ऽ | ची | ऽ | शप | थ | ऽ | तु | ला | ऽ | जि | व |
| सा | रे | ऽ | म | ग् | रे | सा | रे | नि़ | सा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| ल | गा | ऽ | तु | ला | ऽ | जि | व | ल | गा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| रे | रे | ग् | ऽ | रेग् | मग् | सा | ऽ | रे | रे | म | प | ऽ | ध | पध | नि् |
| मु | खी | सु | ऽ | धेऽ | ऽऽ | चा | ऽ | क | ल | श | ला | ऽ | वि | ला | ऽ |
| ध | प | ऽ | ऽ | मप | गम | रेग् | सारे | रे | म | मम | ऽ | पध | प | धनि् | सां |
| हा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ए | ऽ | कही | ऽ | नाऽ | ऽ | हींऽ | ऽ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | | | ० | | | | + | | | | ० | | | |
| १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ |
| नि्ध | ऽ | म | प | ध | नि् | ध | प | ध | नि् | ऽ | प | ध | म | प | ऽ |
| घोऽ | ऽ | ट | घे | ऽ | त | ला | ऽ | न | को | ऽ | स | घे | ऽ | ऊं | ऽ |
| गम | ऽ | ऽ | रे | ग् | सा | रे | ऽ | ध़ | सा | ऽ | सा | रे | प | म | ग |
| असा | ऽ | ऽ | हि | स कु | - | नी | ऽ | न | को | ऽ | स | दे | ऽ | ऊं | ऽ |
| रे | सा | ऽ | सा | रे | प | प | ध | म | प | ऽ | म | ग | म | रे | ग् |
| द | गा | ऽ | ग | ळ्या | ऽ | ची | ऽ | शप | थ | ऽ | तु | ला | ऽ | जि | व |
| सा | रे | ऽ | म | ग् | रे | सा | रे | नि़ | सा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| ल | गा | ऽ | तु | ला | ऽ | जि | व | ल | गा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | | | ० | | | | + | | | | ० | | | |
| १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ |
| ग | म | प | ध | नि् | रें | ऽ | सां | नि् | ऽ | प | ग् | ऽ | रे | सा | ऽ |
| वे | ऽ | ल | प्री | ऽ | ति | ऽ | ची | तूं | ऽ | च | ला | ऽ | वि | ली | ऽ |
| सा | ग् | रे | ऽ | प | नि् | ध | ऽ | ध | नि् | म | प | ऽ | ध | सां | ऽ |
| रु | ज | ली | ऽ | फु | ट | ली | ऽ | फु | लू | ऽ | ला | ऽ | ग | ली | ऽ |
| नि | सां | ऽ | नि | सांरें | नि्ध | प | ऽ | प | ध् | प | म | ग | म | ग् | रे |
| न | को | ऽ | चु | रग | ळूंऽ | ऽ | ऽ | अ | सा | ऽ | क | ठो | ऽ | रा | ऽ |
| ध़ | सा | सा | रे | ऽ | प | म | ग | रें | सा | ऽ | सा | रे | प | प | ध |
| तूं | ऽ | च | रा | ऽ | खि | ली | ऽ | नि | गा | ऽ | ग | ळ्या | ऽ | ची | ऽ |

| + | | | | ० | | | | + | | | | ० | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ |
| म | प | ऽ | म | ग | म | रे | ग् | सा | रे | ऽ | म | ग् | रे | सा | रे |
| शप | थ | ऽ | तु | ला | ऽ | जि | व | ल | गा | ऽ | तु | ला | ऽ | जि | व |

पहिल्या ओळीप्रमाणें वाजविणें

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | ध | सा | रे' | ग्' | रे' | सां | ऽ | प | ध | सां | रे' | ग्' | रे' | सां | ऽ |
| त | हा | ऽ | न | ह | र | ली | ऽ | भू | ऽ | क | ही | स | र | ली | ऽ |
| ग्' | रे' | सां | ऽ | पध | नि्ध | प | ऽ | म | ध | नि् | सां | नि् | ध | प | ऽ |
| ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽऽ | ऽऽ | ऽ | ऽ | ए | ऽ | क | च | आ | ऽ | शा | ऽ |
| ग | म | ऽ | ग | म | प | म | ग् | रे | सा | ग् | रे | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| म | नां | ऽ | त | उ | र | ली | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| रे | म | ऽ | प | ध | ध | धनि् | सां | नि् | ऽ | ध | प | म | ध | प | ऽ |
| पु | न्हा | ऽ | बो | ऽ | ल | तीऽ | ऽ | ना | ऽ | जु | क | भा | ऽ | षा | ऽ |
| प | ध | प | म | ग | रे | रे | ग् | सा | रे | ऽ | ऽ | रेम | पध | मप | ध |
| तूं | ऽ | च | जि | वा | ऽ | चा | ऽ | स | गा | ऽ | ऽ | ऽऽ | ऽऽ | ऽऽ | ऽ |
| प | ध | प | म | ग | रे | रे | ग् | सा | रे | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| तूं | ऽ | च | जि | वा | ऽ | चा | ऽ | स | गा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| ध | सा | सा | सा | रे | प | म | ग | रे | सा | ऽ | सा | रे | प | म | ध |
| तूं | ऽ | च | जि | वा | ऽ | चा | ऽ | स | गा | ऽ | ग | ळ्या | ऽ | ची | ऽ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | | | ० | | | | + | | | | ० | | | |
| १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ |
| म | प | ऽ | म | ग | म | रे | ग॒ | सा | रे | ऽ | म | ग॒ | रे | सा | रे |
| शप | थ | ऽ | तु | ला | ऽ | जि | व | ल | गा | ऽ | तु | ला | ऽ | जि | व |
| नि॒ | सा | ऽ | ऽ | | | | | | | | | | | | |
| ल | गा | ऽ | ऽ | | | | | | | | | | | | |

******

## सखये प्रेमपत्र पहिलें * * [ ताल : केरवा ]

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | | | ० | | | | + | | | | ० | | | |
| १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ |
| | | ग | म | प | सां | ऽ | ऽ | नि॒सां | धनि॒ | प | ऽ | पध | नि॒ऽ | ध | प |
| | | स | ख | ये | ऽ | ऽ | ऽ | ऽऽ | ऽऽ | ऽ | ऽ | प्रेऽ | ऽऽ | म | प |
| ध | प | ग | प | म | ऽ | ग | सा | ग | म | प | ग | ग | म | प | ग॒ |
| ऽ | त्र | प | हि | लें | ऽ | ऽ | ऽ | स | ख | ये | ऽ | प्रे | ऽ | म | प |
| ऽ | सा | रे | नि | सा | ऽ | ऽ | ग | रे | सा | नि॒ | सा | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| ऽ | त्र | प | हि | लें | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| सा | रे | नि॒ | ऽ | सा | ग | ग | ऽ | गम | प | म | ग | म | प | प | प |
| म | ख | मा | ऽ | ली | ऽ | गा | ऽ | लाऽ | ऽ | व | री | ला | ऽ | ज | त |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | | | ० | | | | + | | | | ० | | | |
| १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ |
| प | ध | नि़ | ध | प | म | प | म | ग | ऽ | ऽ | म | ग | सा | ग | म |
| अ | ध | रां | ऽ | नीं | ऽ | लि | हि | लें | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | स | स |

| | | | |
|---|---|---|---|
| प | सो | ऽ | ऽ |
| ये | ऽ | ऽ | ऽ |

ही ओळ पहिल्याप्रमाणें वाजवावी.

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | ऽ | प | नि़ | पनि़ | पम | ग | म | प | नि | सां | रें | सां | नि | सां | ऽ |
| अं | ऽ | गां | ऽ | गाऽ | ऽऽ | व | री | रं | ऽ | ग | प | स | र | ला | ऽ |
| सा | गं | गं | ऽ | रेंमं | गंरें | सां | नि | सांनि | सांगं | रें | गं | सां | रें | सां | ऽ |
| म | णि | बं | ऽ | धिऽ | ऽऽ | फि | र | फिरु | नीऽ | ऽ | ऽ | पु | स | ला | ऽ |
| प | ध | सां | सां | सांरें | गं | रें | गंऽ | सां | सांरें | नि़ | ध | म | ग | म | ऽ |
| उ | पा | ऽ | य | माऽ | ऽ | झा | ऽऽ | ऽ | पुर | ता | ऽ | फ | स | ला | ऽ |
| सां | ऽ | नि | सां | नि़ | ध | म | ग | म | ऽ | ग | सा | ग | म | प | ग |
| यौ | ऽ | व | न | र | स | र | स | लें | ऽ | ऽ | ऽ | स | ख | ये | ऽ |
| ग | म | प | ग | ऽ | सा | रे | नि | सा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| प्रे | ऽ | म | प | ऽ | त्र | प | हि | लें | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |

पहिल्या ओळीप्रमाणें ' सखये प्रेमपत्र ' ही ओळ वाजविणें.

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | ऽ | नि़ | ध | धनि़ | सां | सां | ध | नि़ | सां | नि़ | ध | नि़ | सां | सां | ऽ |
| वा | ऽ | चा | ऽ | याऽ | ऽ | तें | ऽ | न | य | नें | ऽ | मि | ट | ली | ऽ |

| + | | | | ० | | | | + | | | | ० | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ |
| प | ध | सां | सांरें | गंरें | गंरें | सां | ऽ | सां | रें | नि् | नि् | ध | प | ध | पऽ |
| त | रि | ही | लाऽ | ऽऽ | जरी | ऽ | ऽ | हौ | ऽ | स | न | फि | ऽ | ट | लीऽ |
| प | ध | सां | सां | रें | गं् | सां | ऽ | सां | रें | नि् | ध | म | ग | म | ऽ |
| जा | ऽ | ति | न | लि | खि | तें | ऽ | पु | स | तां | ऽ | पु | स | ली | ऽ |
| सां | नि | सां | ऽ | नि् | ध | प | गप | म | ऽ | ग | सा | ग | म | प | निसो |
| अं | ऽ | त | ऽ | रं | ऽ | ग | कळ | लें | ऽ | ऽ | ऽ | स | ख | ये | ऽऽ |
| सां | नि | सां | ऽ | नि् | ध | | गप | म | ऽ | ग | सा | ग | म | प | ग |
| अं | ऽ | त | ऽ | रं | ऽ | ग | कळ | लें | ऽ | ऽ | ऽ | स | ख | ये | ऽ |
| ग | म | प | ऽ | ग् | ऽ | सा | रेनि़ | सा | ऽ | ऽ | ग | म | प | ग | म |
| प्रे | ऽ | म | ऽ | प | ऽ | त्र | पहि | लें | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | स. | ख |
| प | सां | ऽ | ऽ | नि्सां | धनि् | प | ऽ | पध | नि्ऽ | ध | प | ध | प | ग | प |
| ये | ऽ | ऽ | ऽ | ऽऽ | ऽऽ | ऽ | ऽ | प्रेऽ | ऽऽ | म | प | ऽ | त्र | प | हि |
| म | ऽ | ग | सा | ग | म | प | ग | ग | म | प | ग् | ऽ | सा | रे | नि़ |
| लें | ऽ | ऽ | ऽ | स | ख | ये | ऽ | प्रे | ऽ | म | प | ऽ | त्र | प | हि |
| सा | ऽ | ऽ | ऽ | | | | | | | | | | | | |
| लें | ऽ | ऽ | ऽ | | | | | | | | | | | | |

# भिकारीण

: कवि :
ग. ल. ठोकळ

मज दीनेची कींव येउं द्या कांहीं
घाला हो भिक्षा माई

हें ऊन किती कडक तापतें बाई
अंगाची फुटते लाही

या तीन दिसांपासुन खाया कांहीं
शीतही मिळालें नाहीं

मी किती तरी फिरलें दारोदार
घेउनी कडेवर पोर
कंठांत गुंतले प्राण
जाहला जीव हैराण
भीक मागण्याला त्राण

कांहींच बरें आतां उरलें नाहीं
घाला हो भिक्षा माई !

ज्या दिवशीं हें कुंकूं माझें पुसलें
मज अभाळ उघडें पडलें

दो महिन्यांचें सवें घेउनी बाळ
वणवणलें रानोमाळ

मी आजवरी वांचविलें बाळाला
चिंचेचा खाउन पाला



REFBK-0019888
REFBK-0019888

पण अतां फुटेना पान्हा
वांचवा लाडका तान्हा
देखवे न याची दैना

तिळतीळ तुटे माझें काळिज बाई
घाला हो भिक्षा माई

दो दिवसांचा शिळा वाळला तुकडा
चालेल अम्हांला वाढा

तो चाउनिया बाळाला भरवीन
मांडीवर मग निजवीन

कां माई हो, अशा लावितां दार ?
नाहीं मी पुन्हा येणार

बाळा, चल, पुढतीं जाऊं
केविलवाणें नच पाहूं
हा मुकाच घे तुज खाऊ

चल, भीक अतां आपण मागायाला
देवाच्या जाऊं घराला !

१९८८८

: गायिका :
लीला सावंत

# नकळत कशी मी हंसलें ?

नकळत कशी मी हंसलें
बघुनि कुणाला लाजलें
गालीं गुलाबी गुलाब फुलले
सख्या प्रियकरा समोर बघतां
मधुर प्रीतिचा अनुभव घेतां
प्रणय पुष्प हें मनीं उमललें

| : गायक : | : पद्य : | : स्वररचना : |
|---|---|---|
| जे. एल्. रानडे | ग. के. दातार | वि. दे. अंभईकर |





चित्रकार



संपादक

प्रकाश स्टुडिओ

या संग्रहातील कांहीं निवडक भावगीतें कोलंबियाच्या कलावंत गायकांनीं अतिशय लोकप्रिय केलीं आहेत. त्यांच्या ध्वनिमुद्रिका खालीं दिल्याप्रमाणें कोलंबिया क्रमांकावर मिळूं शकतात.

**श्री. गोविंद कुरवाळीकर**

GE 3314 { बघा न अमुच्याकडे / चल डोलत डौलात रे

**कु. लता मंगेशकर**

GE 8236 { आली दिवाळी / भाऊबीजेला आला

**कु. सरोज वेलिंगकर**

GE 8469 { माहेरचें नांव राहूं दे / गाडीवान दादा

**सौ. कालिंदी केसकर**

GE 3279 { राया भारीच उशीर / मानस लहरीवरी

**कु. मालती पाण्डे**

GE 8295 { अंगणांत खेळे राजा / श्रावण आला

**कु. कुमुदिनी पेडणेकर (पुणें)**

GE 8428 { हसलास कां सख्या रे / हांस हांस ग फुलराणी

**सौ. नलिनी मुळगांवकर बी.ए.**

GE 8437 { मी हसलें मनीं रमलें / थांब ना थांब ना

**कु. वसुन्धरा श्रीखण्डे**

GE 8439 { भोळा माझा जीव / नभीं रंगुनी गात

Columbia Records
MAGIC NOTES TRADE MARK

# कोलंबिया ग्रामोफोन कं. लि.

कलकत्ता ★ मुंबई ★ दिल्ली